**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/२०३/२०२३

दिनांक -२४.०२.२०२५

**प्रति,**

१. तुळसाबाई मनोहर यमगर
रा.बागेवाडी ता.जत जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सुनिल मुरारी पडोळकर
२. विष्णु बापू पडोळकर मयत वारस
२/१. कामिनी विष्णु पडोळकर
२/२.सचिन विष्णु पडोळकर
२/३.आकाश विष्णु पडोळकर
२/४. साहील विष्णु पडोळकर
अ.क्र. १ रा.८ वी, गल्ली, राजवंतीनगर, जयसिंगपूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर
अ.क्र.२अ ते २ड रा. बागेवाडी ता.जत जि.सांगली ---- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र.**

**वाद मिळकतीचा तपशिल.**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| बागेवाडी | जत | ४८ | ०१ हे.७२ आर.,<br>पो.ख.०० हे. ०० आर. | ०० हे. १३ आर.,<br>पो.ख.०० हे.०० आर. | १९६० |

मौजे बागेवाडी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर १९६०, प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिल प्रकरणी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. मंडळ अधिकारी डफळापूर यांनी फे.नं.९१९ ची नोंद नामंजुर करुन त्याचा अम्मल ७/१२ सदरी देताना जाबदार नं. १ व जाबदार नं.२/अ ते २/ड चे पुर्वाधिकारी विष्णू बापू पडोळकर यांच्या नावाची नोंद भोगवटदार सदरी ठेवण्याची बाब ही चुकीची बेकायदेशीर आहे. नोंद नामंजुर करुन अपिलार्थी यांची आई तानाबाई दादू पडोळकर हिच्या नावाची नोंद इतर हक्कामध्ये ग.स्व.मु.ख.दे. असे नमुद केले आहे ते चुकीचे व बेकायदेशीर आहे. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियमातील तरतुदीकडे व महाराष्ट्र जमिन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३.५.६ आणि ७ मधील तरतुदीकडे दुर्लक्षीत केले आहे.

२. मंडळ अधिकारी डफळापूर यांनी विष्णू बापू पडोळकर यांचे पश्चात जाबदार अ.नं.२/अ ते २/ड यांच्या नावाची नोंद फे.नं.१९६० ने मंजुर करताना अपिलार्थी यांना कोणतीही नोटीस न बजावता व तिला कोणतीही संधी नदेता ती प्रमाणीत करण्याचा आदेश केला आहे तो चुकीचा, बेकायदेशीर आहे.

३. मंडळ अधिकारी डफळापूर यांनी मुळात फे. नं.९१९ हा रद्द झालेला असुनही केवळ ७/१२ उतायास मालक/भोगवटदार रकान्यामध्ये मयत विष्णु बापू पडोळकर याच्या नावाची नोंद असलेचा गैरफायदा घेऊन जाबदार नं.२/अ ते २/ड यांनी वारस नोंदीसाठी दिलेल्या अर्जाची नोंद फे.नं.१९६० ने प्रमाणित केली. ही बाब चुकीची, बेकायदेशीर आहे.

**जाबदार नं.१ व २अ ते २ड यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी अपील धादांत खोटे व लवाडीचे असून ते मान्य व कबूल नाही. अपिलार्थी यांनी जत येथील दिवाणी न्यायालयात रे.क.नं. २५०/२०२१ चा जो दावा दाखल केला आहे त्याचा उल्लेख या अपीलात केलेला नाही. यावरून अपिलार्थीची लबाडी दिसून येते. दिवाणी दाव्यामध्ये सदर दावा मिळकतीचा ७/१२ हजर केलेला आहे त्याचा विचार करता सन २०२१ साली जाबदार यांच्या नावाची नोंद झालेची अपिलार्थी यांना माहिती होती, परंतू या अपीलकामी सदरची वाव लपवून ठेवलेली आहे. खालील कोर्टानी फेरफार नं. १९६० मंजूर करताना योग्य त्या सर्व महसूल कायद्यातील तरतूदींचा पूर्णपणे विचार केलेला आहे मुलतः फेरफार नं ९१९ नामंजूर करताना तत्कालिन मंडळ अधिकारी यांनी सदसदविवेकबुद्धीचा वापर केला नव्हता. तत्कालिन मंडळ अधिकारी यांनी फेरफार नं. ९१९ नामंजूर करताना दिलेले तारण हास्यास्पद होते. अपिलार्थीचे पुर्वहक्कदार व जाबदार यांचेदरम्यान झालेला दि.०३/०२/२००३ चा गहाण स्वरूपी मुदत खरेदीचा दस्त नोंदणीकृत होता. सदरचा दस्त अपिलार्थी हिची आई तानाबाई उर्फ तानुबाई दादू पडोळकर हिने लिहून दिलेला होता व रक्कम रू.५५,०००/- स्विकारलेली होती. त्या दरताची नोंद मे.दुय्यम निबंधक कार्यालय, जत येथे झालेली आहे त्याचा नोंदणी क. २२८/२००३ असा आहे. सदर नोंदणीकृत दस्तास अपिलार्थी हिची दुय्यम निबंधक कार्यालयात मान्यता घेतलेली आहे तसा स्पष्ट उल्लेख नोंदणीकृत दस्तामध्ये केलेला आहे. तो दस्त या अपीलासोवत अपिलार्थी यांनी जोडलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता मान्यता देणार अपेलंट श्रीमती तुळसाबाई मनोहर यमगर असा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच फेरफार नं. ९१९ मध्ये देखील फेरफार घालताना मान्यता देणार म्हणून श्रीमती तुळसाबाई मनोहर यमगर चे नाव नमुद आहे. या सर्व गोष्टी मंडळ अधिकारी डफळापूर यांनी २००३ मध्ये बघितले आहे असे असताना मंडळ अधिकारी डफळापूर यांनी जावई शोध लावून मुलीची संमती नाही या कारणावरून फेरफार नामंजूर केला ही गोष्ट हास्यास्पद आहे.

२. अपिलार्थी यांनी मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन जत यांचे कोर्टात रे.क.नं.२५०/२०२१ चा कब्जाचा दावा दाखल केलेला आहे याची कोणतीही माहिती मे. कोर्टासमोर अपेलंट यांनी दिलेली नाही. सदरचा दावा दि.०६/१०/२०२१ रोजी दाखल केलेला आहे. याचा विचार करता दिवाणी न्यायालयात सन २०२१ साली दावा दाखल केला असताना सदरचे अपील दाखल करताना जो विलंब झालेला आहे ही बाब विश्वसाहय वाटत नाही. रे.क.नं.२५०/२०२१ चा दिवाणी दाव्याच्या कामामध्ये दि. २८/०७/२०२१ चा ७/१२ उतारा जोडलेला आहे त्यावर जाबदार नं. २अ ते २ड यांची नावे नमुद आहेत. सदरचा ७/१२

दिवाणी न्यायालयात अपिलार्थी यांनीच हजर केलेला आहे. याचा विचार करता दि.०६/१०/२०२१ रोजीच दावा दाखल करताना सदरची वाव माहित होती हे स्पष्ट होते. याचा विचार करता अपेलंटचे अपील नामंजूर होणेस पात्र आहे.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे बागेवाडी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर १९६०, प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे. वादातीत फेरफाराने कै.विष्णू बापू पडोळकर हे मयत झालेनंतर त्यांचे वारस म्हणून जाबदार क्र.२/१ ते २/४ यांची वारसा नोंद झालेली आहे.

२. प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, फेरफार क्र.९१९ ने जाबदार क्र.०१ व जाबदार क्र.२/१ ते २/५ चे पुर्वहक्कदार विष्णू बापू पडळकर यांची नांवे दाखल झालेचे दिसून येते. तथापि सदर फेरफार मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी नामंजूर केलेला आहे. सदर नामंजूर झालेल्या फेरफार विरूध्द जाबदार यांनी कोणत्याही सक्षम न्यायालयात दाद मागणी केलेचे दिसून येत नाही. यांचाच अर्थ सदर फेरफार क्र.९१९ आजअखेर नामंजूरच आहे असे असतांना सदर फेरफारचा अंमल ७/१२ सदरी झालेचे दिसून येते जे बेकायदेशीर आहे.

३. सबब, जाबदार क्र.१ व २/१ व २/४ यांचे पुर्वहक्कदार यांची नांवे ७/१२ सदरी दाखल आहेत. ती दाखल नांवेच मुळात बेकायदेशीर व पोकळ स्वरूपाची असून त्यात बदल करणे आवश्यक असतांना मंडळ अधिकारी डफळापूर यांनी याउटलट जाबदार २/१ ते २/४ यांचे पुर्वहक्कदार विष्णू बापू पडळकर यांचे वारस म्हणून जाबदार क्र.२/१ ते २/४ यांची नांवे नोंद करणे हे कायदेशीरदृष्या अयोग्य असलेचे माझे मत झालेने मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील मान्य करणेत येत आहे. मौजे बागेवाडी ता.जत येथील फेरफार नोंद नंबर १९६० ची नोंद रद्द करण्याचा आदेश देण्यात येत आहे. तसेच मंडळ अधिकारी डफळापूर यांना असेही आदेश करणेत येत आहे की, नामंजूर फेरफार क्र.९१९ चा अंमल ७/१२ सदरी झालेला आहे तो कमी करावा.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.